# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**स्पर्धेत जिंकण्यासाठी नाही, तर शिकण्यासाठी सहभागी व्हा - प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर**

**'ऑप्टीकल मेथड ऑफ ॲनालिसिस' वर सेमिनार संपन्न**

अमरावती.

विद्यार्थ्यांनी स्पर्धेत जिंकण्यासाठी नाही, तर शिकण्यासाठी सहभागी व्हा, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी केले. विद्यापीठाचा पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग व विद्यापीठ रसायनशास्त्र शिक्षक संघटना यांचे संयुक्त विद्यमाने 'ऑप्टीकल मेथड ऑफ ॲनालिसिस' या विषयावर विभागीय पदव्युत्तर सेमिनार स्पर्धा नुकतीच संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर दिल्ली विद्यापीठाचे प्रा. अशोक प्रसाद, रसायनशास्त्र शिक्षक संघटनेचे सचिव डॉ. प्रशांत मंडलिक, विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार, कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. मनिषा कोडापे उपस्थित होते.

प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर पुढे म्हणाले, अशा प्रकारच्या सेमिनार मधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर; विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य, समयसुचकता व बौद्धीक कौशल्ये आदी गुणांचा विकास साधता येतो. जय-पराजय याचा विचार न करता स्पर्धेकडे संधी म्हणून बघा, असा उपदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मार्गदर्शन करतांना प्रा. अशोक प्रसाद यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी मूलमंत्र सांगून अशा सेमिनार स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात व विषयाबाबतचा समज व कौशल्य वाढविण्यास मदत होते आणि विविध पुस्तकांचे वाचन वाढीस लागून विषयातील बारकावे लक्षात येण्यास उपयुक्त ठरते. डॉ. प्रशांत मंडलिक यांनी रसायनशास्त्र शिक्षक संघटना राबवित असलेल्या पदवी ते पदव्युत्तर स्थरापर्यंत विविध उपक्रमांची माहिती दिली. विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.

स्पर्धेच्य बक्षिस वितरण समारंभाकरिता स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील रसायनशास्त्र विभागाच्या संचालक डॉ. संगिता माकोणे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, स्पर्धेतून व्यक्तिमत्व विकास साधता येतो आणि स्पर्धेतील सादरीकरणातूनच विद्यार्थी घडत असतो. विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, चिकाटी व परिश्रम अशा गुणांची जोपासना करावी, असेही त्या म्हणाल्या.

स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरणनगर, अमरावती येथील कु. जुमाना बहिवाला हिने प्रथम, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील कु. स्नेहल होले हिने द्वितीय, तर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील कु. रुपाली जाधव हिने तृतीय पारितोषिक पटकाविले. स्पर्धेमध्ये पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून नागपूरचे डॉ. विजय तांडगे, नांदेडचे डॉ. संतोष देवसरकर व दिल्लीचे डॉ. अशोक प्रसाद यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व कर्मयोगी संत गाडगे बाबा यांचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. मनिषा कोडापे यांनी करुन दिला. संचालन कु. अमृता मकेश्वर व कु. योगिता पुरी यांनी, तर आभार कु. दिव्या दिक्षित हिने मानले. कार्यक्रमाला विभागातील शिक्षक डॉ. जागृती बारब्दे, डॉ. चंद्रशेखर लाडोळे, डॉ. जयंत वडतकर, श्रीराम सातव, अभिषेक ताडे, जामिर शेख, प्रा.कु. सोनकुसरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील कु. पायल टाले, सागर रेवाडे, युसुफ भिमाणी, कु. पायल कडू, शांतुलाल मावस्कर, शेख समिर, कु. निकिता राजपूत, कु. स्मीता नंद आदींनी अथक परिश्रम घेतलेत. कार्यक्रमाला शहरातील सर्वच महाविद्यालयांतील पदव्युत्तर रसायनशास्त्र विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १३/०४/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी